३१ टी

महसूल व वन विभाग

मा.मुख्य सचिवांबरोबर आज दिनांक ०१ जून,२०१० रोजी चर्चा झाली. श्री.ठोसरे यांच्या पदोन्नतीसंबंधी पदोन्नती समितीची बैठकीच्या दिनांक व वेळेबाबत चर्चा करण्याबाबत त्यांना कल्पना देण्यात आली की, त्यांच्या निदेशाप्रमाणे प्रधान मुख्य वन संरक्षक यांचेकडून अहवाल मागवून घेवून श्री.ठोसरे यांच्या मेसर्स श्री प्रिकोटेड स्टील लिमिटेड, सणसवाडी (तालुका शिरुर, जिल्हा पुणे) या प्रकरणाबाबत खुलासा मागविण्यात आलेला आहे. त्याच वेळी असाही खुलासा करण्यात आला की, पदोन्नती देण्याविषयी पदोन्नती समिती निर्णय घेवून कोणत्याही अधिकाऱ्यावर जर विभागीय चौकशी प्रस्तावित किंवा चालू असेल तर लखोटा बंद करुनच निर्णय घेता येतो. श्री.ठोसरे यांच्या प्रकरणी सध्या असे काहीही प्रस्तावित नसल्यामुळे, त्यांच्या पदोन्नतीसाठी पदोन्नती समितीची बैठक या मुद्यावर प्रलंबित ठेवणे योग्य होणार नाही. मा.मुख्य सचिवांनी त्याला दूरध्वनीवरुन मान्यता दिली असल्यामुळे दिनांक १४ जून,२०१० रोजी या विभागाच्या इतर पदोन्नती समितीच्या बैठकीसोबतच श्री.ठोसरे यांच्या पदोन्नतीकरिता पदोन्नती समितीची बैठक ठेवण्यात यावी, ही विनंती.

(स्वाक्षरी)
अपर मुख्य सचिव (वने)

मा.मुख्य सचिव

2 JUN 2010